आनंदराव जमाले विाा उमेश तवर वगैरे नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०१३
निशाणी क्र. **१५५** पुढे सुरु.

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.डी.आर.पाटील यांच्या वतीने उलटतपास सुरु</u>–**

०१. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रामध्ये नमुद गजानन पान शॉप व कोल्ड्रींक दुकानाकरीता शासनाकडुन शॉप ॲक्ट लायसन्स आवश्यक असते. तसा परवाना माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो मी अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच तो अभिलेखावर दाखल करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तसे लायसन्स माझ्याकडे नसलेमुळे मी ते दाखल केले नाही. मी सदर लायसन्स अभिलेखावर दाखल करणेस तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कथीत दुकान जागा माझ्या मालकीची नाही ती भाडोत्री आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत भाडे करारबाबत मी शपथपत्रामध्ये मजकुर नमुद केला नाही. तसेच कथीत भाडेकरार अभिलेखावर दाखल केला नाही. सदर भाडेकरार मी अभिलेखावर दाखल करणेस तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत दुकान त्या ठिकाणी नसल्यामुळे मी कथीत भाडेकरार दाखल करणेस तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तोंडी कथनाशिवाय कथीत दुकान त्या ठिकाणी आहे हे दर्शवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

०२. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाहेब ज्ञानदेव शिंदे यांना मी ओळखतो. ते माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, इतर वादी माझ्या परिचयाचे आहेत. साक्षीदार सांगतो की, प्रतिवादी देखील परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादींच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या वस्तुस्थितीबाबत (प्रत्यक्ष क्षेत्रफळ,अधिग्रहीत क्षेत्रफळ इत्यादी.) मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमधुन कराड ते चिपळुण हा महामार्ग गेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादींच्या सांगण्यावरुन मी शपथपत्रामध्ये सन २००९ साली वादींनी कथीत कुंपण केल्याचे व पत्रा शेड घातल्याचे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये कोणाची वहिवाट आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत खुली जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

आनंदराव जमाले विाा उमेश तवर वगैरे

नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०१३
निशाणी क्र. **१५५** पुढे सुरु.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.04.06 15:59:41 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक –०६/०४/२०२६.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड.